**नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,**
**शाखा औरंगाबाद.**

जा.क्र. भूखंड एकत्रिकरण/मौजे आघुर /ता.वैजापूर/गट क्र. २१९ पै./ससंऔ/ १३९८ औरंगाबाद.
दि : ०९/०५/२०१९

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
औरंगाबाद

**विषय :- मौजे आघुर ता. वैजापूर जि.औरंगाबाद येथील गट क्र. २१९ पैकी**
मधील भूखंड क्र. ९५ ते ११४ चे एकत्रिकरण नकाशांना अंतिम मंजूरी बाबत.
अर्जदार : श्री. उमेश भुजंगअप्पा वाळेकर व इतर

**संदर्भ** :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र. भूखंड एकत्रिकरण/मौजे आघुर /ता.वैजापूर/ गट क्र. २१९ पै./ससंऔ/७०८, दिनांक ०३.०४.२०१९.
२) अर्जदार यांचा दिनांक ०४.०२.२०१९ रोजीचा अर्ज.

महोदय,

संदर्भित पत्र क्र.१ अन्वये मौजे आघुर ता. वैजापूर जि.औरंगाबाद येथील ग.नं. २१९ पै. मधील क्षेत्र ४८४००.०० चौ.मी. पैकी २४५७.०० चौ.मी. क्षेत्रासाठीच्या एकत्रिकरणाच्या प्रस्तावास तत्वतः मंजूरीची शिफारस केलेली आहे. संदर्भ क्र.२ अन्वये अर्जदार यांनी या कार्यालयास सिमांकित अभिन्यास व सिमांकित मोजणी नकाशे सादर करुन एकत्रिकरण नकाशांना अंतिम मंजूरीसाठी शिफारस करणे बाबत विनंती केली आहे.

मौजे आघुर ता. वैजापूर जि.औरंगाबाद येथील ग.नं. २१९ पैकी मधील अभिन्यासास या कार्यालयाने पत्र क्र. ७६३, दिनांक ३०.०७.२०१० अन्वये **निवासी** वापरासाठी अंतिम मंजूरीची शिफारस केलेली आहे. तसेच सदर अभिन्यासास मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी आदेश क्र. २०१०/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/मौजे आघुर, ता.वैजापूर/प्र.क्र.२५४,दि.०३.०३.२०११ अन्वये **निवासी** प्रयोजनार्थ बिनशेती परवानगी दिलेली आहे. सदर मंजूर अभिन्यासातील भूखंड क्र. ९५ ते ११४ चे एकत्रिकरणासाठी नकाशांची तांत्रिक छाननी केली असता नकाशे सर्वसाधारणपणे योग्य असल्याने निवासी प्रयोजनार्थ अंतिम मंजूरीची शिफारस खालील अटींचे अधिन राहून करण्यात येत आहे.

१) सदर जागेतील सध्या अस्तित्वातील असलेली झाडे असल्यास ती विना परवानगीने तोडू नये.

२) मुळ मंजूर अभिन्यासातील सदरहू जागेतील भूखंडाच्या एकत्रिकरणानंतर बाबतची नोंद भूखंड क्र. ९५ ते ११४ रद्द करणे व एकूण भूखंडाच्या संख्या मध्ये नकाशात दर्शविल्यानुसार बदल बाबतची नोंद महसूल स्तरावर करुन घेणे आवश्यक राहील.

३) सदर भूखंडाचे एकत्रिकरणानंतर बांधकाम परवानगीसाठी नियोजन प्राधिकरणाकडे स्वंतत्रपणे प्रस्ताव दाखल करणे आवश्यक राहील.

४) सदरहू प्रकरणात एकत्रिकरण नकाशांना मंजूरीची शिफारस करतांना अर्जदाराने प्रकरणासोबत दाखल केलेली मालकी हक्काची कागदपत्रे ग्राहय धरण्यात आली आहेत. सदर कागदपत्रे भविष्यात दिशाभूल करणारी आढळून आल्यास सादर एकत्रिकरण परवानगीची शिफारस रद्द समजण्यात येईल.

५) मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी आदेश क्र. २०१०/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/मौजे आघुर, ता.वैजापूर/ प्र.क्र.२५४,दि.०३.०३.२०११अन्वये दिलेल्या अकृषीक परवानगीतील अटी व शर्तीचे पालन अर्जदार यांनी करणे बंधनकारक राहील.

६) या कार्यालयाने शिफारस केलेल्या उपरोक्तलिखीत पत्र क्र. ७६३, दिनांक ३०.०७.२०१० मधील सर्व अटी लागू राहतील व त्यांची पुर्तता करणे संबंधीतांवर बंधनकारक राहतील.

७) सदर भूखंड एकत्रिकरणामुळे मुळ मंजूर अभिन्यासातील इतर भूखंडधारकांचे मुळ अधिकार बाधीत होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

८) सदर एकत्रिकरण नंतर सुध्दा उक्त भूखंडामध्ये **निवासी** वापर अनुज्ञेय राहील. तसेच अनुषंगीक नियमावलीच्या तरतूदीनुसार चटई क्षेत्र निर्देशांक इत्यादी बाबी अनुज्ञेय होतील.

९) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ ए ते एल नुसार विकास शुल्क रु.२०,२५२/- डिफेस चलन क्र.०००७६७१६४१२०१८१९ दि. २९.०३.२०१९ अन्वये भरणा करण्यात आला आहे.

१०) प्रस्तुत जमीनीवर भविष्यात छाननी शुल्क, विकास शुल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याणउपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्‌भवल्यास सदर रक्कम महानगर नियोजन प्राधिकरण/ जिल्हाधिकारी/ मुख्याधिकारी यांचेकडे जमा करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

**अंतिम** मंजुरीची शिफारस केलेल्या अभिन्यासाची एक प्रत या कार्यालयाचे अभिलेखासाठी ठेवण्यात येऊन दोन प्रती या सोबत पाठविण्यात येत आहेत.

आपला,

सोबत:- वरील प्रमाणे.

प्र. सहायक संचालक, नगर रचना,
औरंगाबाद.

प्रत: १) उपअधिक्षक, भूमी अभिलेख, वैजापूर यांना माहितीस्तव.
२) अर्जदार : श्री. उमेश भुजंगअप्पा वाळेकर व इतर यांना माहितीस्तव.

415|2019




LAYOUT PLAN
SCALE NTS




LOCATION PLAN
SCALE :NTS

Town Planning and Valuation Department, Branch Office, Aurangabad. सत्यमेव जयते

Recommended for Final Approval as Ammended
In .......................... subject to condition mentioned in this office letter No ....1398....
dated ...09/07/2019

Assistant Director of Town Planning
Aurangabad.




FINAL PLAN FOR PLOT NO-95
(AFTER AMALGAMATION ON P-95 TO 114)
SCALE :1:200

| PLOT AREA STATEMENT | |
|---|---|
| PLOT NO-95 (PLOT NO.96 TO 114 CANSELED) | 2579.86 SQM |

LEGEND

PLOT BOUNDARY SHOWN IN

| DATE | REVISIONS |
|---|---|
| TITLE OF THE PROJECT | DEMARCATED PLAN FOR PLOT NO.95 (96 &114 NO IS CANSULED) ON GUT NO. 219(P) MOUJE. AAGHUR , TQ.VAIJAPUR & DIST. AURANGABAD<br>NAME OF OWNER:<br>1)SHRI UMESH BHUJANGAPPA WALEKAR<br>1)Tantetive layout/latter no :763 Dated 30-07-2010<br>2)Demarcated layout/latter no :----- Dated 11-10-2010<br>3)N.A Order no- 2010/Mashaka/Jameen-1/ NA/p-34/mouje Aaghur.Tq.Vaijapur Dist. Aurangabad/pra.kra.254/Date 03/03/2011 |
| | OWNERS SIGN |

ARCHITECT/ENGINEERS :

B.V. RAUT, L.No. ADTP/142/18 A'bad, Consulting Engineer